इयत्ता १ ते ५ वर्गशिक्षणात ज्ञानरचनावाद अध्ययन पद्धतीच्या उपयुक्ततेचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत
विद्यावाचस्पती (पिएच.डी.) पदवी करिता
सादर करावयाचा संशोधन आराखडा

-:: संशोधक ::-
मुळे रामकिशन ग्यानबा
एम.ए.(इंग्रजी), एम.फिल, एम.एड्.

-:: मार्गदर्शक ::-
प्रा.डॉ.मोरे व्ही.पी.
एम.कॉम.,एम.ए. (अर्थशास्त्र), एम.ए.(इतिहास),
सेट, पिएच.डी.
प्राचार्य
शिक्षणशास्त्र महाविद्याल,कळमनुरी जि.हिंगोली.

-:: संशोधन केंद्र ::-
शिक्षणशास्त्र विभाग,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा, विद्यापीठ,नांदेड

सन २०१७

इयत्ता १ ते ५ वर्गशिक्षणात ज्ञानरचनावाद अध्ययन पद्धतीच्या उपयुक्ततेचा अभ्यास

१.१ प्रस्तावनाः-

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षक हा समाज परिवर्तक आहे. शिक्षक हा समाजिक अभियंता आहे. व्यक्तिच्या आयुष्याला, विचाराला आणि कृतीला आकार देण्यात शिक्षकांचा सिंहाचा वाटा असतो. कोणत्याही राष्ट्राची राष्ट्रिय गुणवत्ता त्या राष्ट्रातील शिक्षकांच्या गुणवत्तेपेक्षा जास्त असू शकत नाही. शिक्षक हा आदर्शाचा अर्क, पावित्र्याचे प्रेरक रूप, अविरत प्रसन्नतेचे वरदान, स्वयंप्रकाशित हिऱ्याचे प्रेरक रूप, भारताच्या भविष्याची शान आहे. शिक्षक हा नॉलेज पॉवर हाऊसचा सीईओ आहे. ज्ञानाचा भांडवलदार, ज्ञानाचे वादळ, प्रकाशाचे बेट, देशाचा भाग्य विधाता, सृजनशील विचारवंत, नवविचारांचा प्रवर्तक, शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, शिक्षणतज्ञ, संत व कवी आहे.

शिक्षणाची ध्येये थोर शिक्षणतज्ञांनी नमुद केलेली आहेत. 'माणुस घडविणे'- स्वामी विवेकानंद, 'सुसंस्कृत नागरिक घडविणे '- डॉ. राधाकृष्णन, 'भाव, भाषा, व जीवन यांचा मेळ '- 'रविंद्रनाथ टागोर, मन, मनगट व बुद्धधी यांचा अविष्कार '- महात्मा गांधी.

राष्ट्रिय प्रगती आणि उत्कर्ष हे मुलांना दिलेल्या शिक्षणावर अवलंबुन आहे.शिक्षण मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. शिक्षणाने माणसांचा सर्वांगीण विकास होतो. व्यक्ती विकास हाच समाजविकास आणि समाज विकास म्हणजेच राष्ट्रविकास होय. भारताला स्वातंत्र्य मिळुन ७० वर्ष झाली. स्वातंत्र्यावेळी असलेली विद्यार्थी, शिक्षक व शाळा संख्या यांचा विचार केल्यास आज प्रचंड मोठी क्रांती झाल्याचे दिसते. साक्षरतेच्या प्रमाणातही अभिमानास्पद वाढ झाली. परंतु आज शिक्षण क्षेत्रातील व्यवस्था व अव्यवस्था पाहिल्यास खुपच बदलास वाव आहे, असे चित्र दिसत आहे.

असर पाहणी (ASSAR), राज्य संपादक सर्व्हे(SLAS) ,राष्ट्रिय संपादणुक पाहणी (NAS) यामधुन धक्कादायक व चिंतनीय चित्र समोर आले आहे. भाषा व गणित या विषयाची प्राथमिक स्तरावरील गुणवत्ता खुपच खालावलेली आहे.माध्यमिक स्तरावरही भाषा विषय

सोडुन फारसे वेगळे चित्र नाही . या पुरोगामी महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गुणवत्तेला लागलेली घसरण आम्हाला भुषणावह नाही.

मुलांची परिक्षेसाठी तयारी करून घेतली जाते. शिक्षण परिक्षांची तयारी हे मनातुन मानले जाते.

अध्ययन अध्यापन	-	परिक्षेसाठी
परीक्षा	-	गुणांसाठी
गुण	-	पुढील प्रवेशासाठी
तो प्रवेश	-	लाभदायक अभ्यासक्रमासाठी
तो अभ्यासक्रम	-	नोकरी, व्यवस्थापनासाठी
ती नोकरी, व्यवसाय	-	द्रव्यार्जनासाठी
ते द्रव्य	-	वस्तूलाभासाठी
त्या वस्तू	-	मनाच्या समाधानासाठी

ही अपेक्षांची मालिका असते. या शृंखलेतुन मुक्त व्हावे व खरे समाधान माणसाला मिळावे. माणसाने त्याचा विचार करावा. हा आग्रह धरला जात नाही .शिक्षणामुळे मुलांच्या जिवनातील स्फूर्ती,सर्जनशीलता, विचारशक्ती, भावनिक उभारी, उपक्रमशीलता, निर्णयक्षमता, संप्रेषणक्षमता वाढायला हवी.

स्वातंत्र्यपूर्ण कालखंडात इंग्रजी शिक्षणातुन कारकून बनतील असेच शिक्षण दिले गेले. रविंद्रनाथ टागोरांची शांतिनिकेतन व महात्मा गांधीजीची मुलोद्योगी / वर्धाशिक्षण योजना विविध कारणांनी अयशयस्वी ठरल्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात वर्तनवादाने त्यांची जागा घेतली . शास्त्रज्ञांनी / शिक्षण तज्ञांनी उंदीर, मांजर, कुत्रा व वानरांवर प्रयोग केले. आलेले निष्कर्ष मानवी वर्तनाला लावले त्यावर आधारीत शिक्षण प्रक्रिया राबवली गेली. गेल्या १५ ते २० वर्षात मेंदू संशोधन झाले. मेंदू स्कॅन होऊ लागला . मेंदूमधील विविध बाबींची / केंद्राचा शोध लागला. त्यानुसार अध्यापन शास्त्र व आकलनशास्त्र विकसित होत आहे.

NCF - २००५,SCF-२०१० व पुर्नरचित अभ्यासकम २०१२ नुसार 'ज्ञानरचनावाद' हा नविन विचार स्विकारला गेला. त्याचप्रमाणे अध्यापणाऐवजी एक नवीन अध्ययन पद्धती

स्विकारली गेलेली आहे. डॉ.एडगर डेल यांच्या मतानुसार ज्ञानग्रहणाचे डोळा ८३%, कान - ११ %, त्वचा ३.५% , नाक १.५%, व जीभ १% असे आहे.कृतीद्वारे पाच ज्ञानेंद्रिये कार्यान्वित होतात,त्यामुळे १००% ज्ञान ग्रहण होते. या शोधांमुळे कृतीला प्राधान्य, मॉस्लेची गरजाधिष्ठित श्रेणी, मेंदु शिक्षण, अध्यायनशास्त्र व आकलनशास्त्राने गती घेतली आहे. मुलं म्हणजे कोरी पाटी, रोपटे, मातीचा गोळा, रिकामे भांडे या सर्व जुन्या धारणा शिक्षणशास्त्राने फेटाळलेल्या आहेत.

मी ऐकतो आणि विसरतो. I hear and I forget.

मी पाहतो आणि लक्षात ठेवतो. I see and I remember

मी करतो आणि मला समजते. I do and I understand.

या तत्वाचा स्विकार करून ऐकणे, पाहणे याऐवजी कृतीवर भर देण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री मा. विनोद तावडे यांच्या नेतृत्वाखाली व राज्याच्या शिक्षणविभागाचे प्रधानसचीव मा. नंदकुमार यांच्या संकल्पनेतुन व मा. शिक्षण आयुक्त मा. धीरजकुमार यांच्या प्रेरणेतुन व विद्यापरिषदेचे संचालक श्री. नांदेडे साहेब यांच्या मार्गदर्शनातून प्रारंभीक स्तरावर प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राची घौडदौड चालू आहे. २२ जुन २०१५ व १६ सप्टेंबर २०१६ च्या प्रगत या शासन निर्णयामुळे महाराष्ट्रातील शिक्षण आज वेगाने बदलत आहे.

१.२ संशोधनाची गरज:

शिक्षण ही अविरत चालणारी प्रक्रिया आहे. येथे परवापर्यंत प्रचलित असणारा अध्ययन अध्यापन प्रवाह आज कालबाह्य होत आहे व त्याची जागा नवीन प्रवाह घेत आहे. विविध प्रकारचे प्रयोग, शोध, संशोधन या माध्यामातून शिकण्याची व शिकवण्याची प्रक्रिया सुलभ करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे.

शासनस्तरावरच असे प्रयोग होतात असे नाही तर, विविध समाजसेवी, शैक्षणिक संस्था तसेच उपकमशील शिक्षक शैक्षणिक प्रयोगामध्ये योगदान देत असल्याचे दिसून येते.

अभ्यासक्रमाची रचना होत असताना अशा नवनविन प्रवाहाचा अभ्यासक्रमात समावेश होत असतो. तो समावेश होण्यापुर्वी विविध पातळीवर त्याची चाचणी झालेली पडताळणी झालेली असते. ज्ञानरचनावाद असाच एक विचारप्रवाह महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात आलेला आहे. शिक्षकांनी अध्यापकाची भुमिका निभवावयाची नसून मार्गदर्शकाची व मित्राची भुमिका निभावणे अपेक्षित आहे. येथे विद्यार्थ्यांना स्वतःच ज्ञानाची निर्मिती करणे अपेक्षित आहे. गटागटात (ग्रुपमध्ये) बसून साहित्य साधनाच्या मदतीने अध्ययन करणे अपेक्षित आहे. कारण कृतीयुक्त शिक्षणानेच अध्ययन दिर्घकाल लक्षात राहते.नविन अभ्यासक्रमामध्ये ज्ञानरचनावाद ही संकल्पना मध्यवर्ती ठेवुन पाठ्यपुस्तकाची रचना व्हावी व यामधूनच महाराष्ट्र शासनाने अपेक्षित धरलेला प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र घडावा यासाठी शाळा - शाळास्तरावर याबाबत विचार मंथन चालू झाले आहे. ज्ञानरचनावाद समजण्यासाठी त्याचा नेमका अर्थ, संकल्पना, व्याख्या, वैशिष्टे, तत्वे याचा विचार करणे आवश्यक आहे.

ज्ञानरचनावाद अर्थ, संकल्पनाः-

ज्ञानरचनावाद हे मेंदू आधारित शिक्षण आहे. मेंदू माहितीवर प्रक्रिया कशी करतो हे म्हणजे 'ज्ञानरचनावाद' होय. ही संकल्पना लेस्ले हार्ट या विचारवंताने मांडली. जीन पियाजे यांना ज्ञानरचनावादी विचारवंत म्हणून संबोधले जाते. जीन पियाजे याचा जन्म १८९६ मध्ये स्विस देशामध्ये झाला. ज्ञानरचनावाद लॅटीन शब्द ' costruere पासुन to construct' हे क्रियापद बनले आहे. याचा सरळ अर्थ मांडणी करणे असा होतो. ज्ञानाची रचना करण्याची प्रकिया कार्यान्वित ठेवणे हा ज्ञानरचनावादाचा गाभा आहे.

ज्ञानरनावादामध्ये अध्ययनार्थी हा ज्ञाननिर्माता असतो. शिक्षकांची भूमिका ही परिस्थिती निर्माण करणे, स्त्रोत पुरवणेची असते. ज्ञानरचनावादामध्ये मनाचा विकास व सामाजिकदृष्ट्या बालकाला मिळालेले अनुभव या दोहोंवर भरअसतो.अध्ययनार्थी ज्ञानाची निर्मिती अनुभवावर करत असतो.

ज्ञानरचनावाद उगम व विकासः-

ज्ञानरचनावादाचा उगम शोधयचा तर कित्येक शतका पाठीमागे सॉक्रेटीस व त्यांचे शिष्य यांच्या वैचारिक चर्चेत याचे बीज सापडते. गिम्बाटिस्का विको (१७१०) यांना ज्ञानरचनावादी तत्वज्ञ म्हणून ओळखले जाते.मानव हा निष्क्रिय ज्ञानप्राप्ती करणारा प्राणी नाही अशा शब्दात पुढे इमॅन्युअल कांट यांनी या संकल्पनेचे अधिक स्पष्टिकरण केले. व्यक्ती प्राप्त माहिती जशीच्या तशी न स्विकारता'स्व' अनुभवाच्या, माहितीच्या आधारे तिची पुनर्रचना करते. हा ज्ञानरचनावादाचा आत्मा आहे. ज्ञानरचनावादाच्या विकासात जॉन ड्युई, जीन पियाजे, जेरोम ब्रुनर,मारिया मॉटेसरी, हर्बर्ट सिमन, पॉल, एडगर्ड मॉरिन , आसुबेल, व्यागोटस्की, ग्लेसर फेल्ड इ. विचारवंताचे योगदान महत्वाचे आहे. ज्ञानरचनावादाचा उगम मोठमोठे विचारवंत, लेखक, शास्त्रज्ञ, समीक्षक, मानसशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ इत्यादींचा संकल्पनेतून साकार झाला आहे.

ज्ञानरचनावाद व्याख्या :-

१. पूर्व ज्ञानाच्या/ पुर्वानुभवाच्या आधारे जेव्हा व्यक्ती नविन संकल्पनाची / संबोधाची रचना करते तेव्हा त्यातून अध्ययन घडते यास ज्ञानरचनावाद म्हणतात.

२. ज्ञानरचनावाद हा अध्ययनाचा एक सात्विक दृष्टिकोन आहे. तो पूढील गृहितकांवर आधारलेला आहे. ज्यामध्ये आपण आपले आकलन ज्या जगामध्ये राहतो, परिस्थितीमध्ये राहतो तेथाील अनुभवांचा आधारे निर्माण करत असतो. म्हणून अध्ययन ही एक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये आपण मानसिक प्रक्रिया नविन अनुभव घेण्यासंबंधी समायोजित करत असतो.

३. ज्ञानरचनावाद ही संकल्पना अध्ययनार्थी स्वत:साठी वैयक्तिकरित्या किंवा सामूहिकरित्या ज्ञानाची निर्मिती करत असतो.यामध्ये अध्ययन करत असताना परिस्थितीय अनुभवांना महत्व दिले जाते. बोधात्मक आणि मानवादी दृष्टिकोनातून तयार केलेल्या उपपतीच्या संचास ज्ञानरचनावाद ही संज्ञा वापरली आहे.

ज्ञान रचनावादी अध्ययनाची वैशिष्ट्ये

१ नवीन अध्ययन हे नविन माहिती आकलनास मदत करते, हे अध्ययनकर्त्याच्या पूर्व ज्ञानावर अवलंबुन असते.

२ ज्ञाननिर्मिती आंतरक्रियात्मक असून नविन ज्ञाननिर्मितीसाठी ती उपयुक्त आहे.

३ अध्ययन ही नविन अर्थ निर्मितीची सक्रिय प्रक्रीया आहे.

४ शिक्षक वर्गाध्यापनात मार्गदर्शक असतो, त्यामुळे विद्यार्थी चिकित्सक व तर्कसंगत विचार मांडणी करू शकतो.

५ अध्ययनात विद्यार्थ्यांचा सहभाग व सक्रियता समजून सुविधादाता ही भूमिका शिक्षकांनी पार पाडावी.

६ नविन ज्ञानाच्या निर्मितीचा अर्थ जाणून घेण्यात काही वेळा पूर्वज्ञानाचा अडथळा निर्माण होतो.

७ शिक्षकाने द्विमार्गी अध्ययन अध्यापनाचा मार्गअवलंबवावा.

८ एखाद्या समस्येविषयी विद्यार्थ्यांनी विविध मार्ग शोधने, सुचविणे, विविध विचार व्यक्त करणे यासाठी शिक्षकांच्या विचारांमध्ये लवचिकता असावी.

९ वर्गात ज्ञानरचनावादाचा वापर केल्यास समृद्ध आंतरक्रिया, सामाजिक समन्वय, कल्पनांची गुंफण इ. प्रक्रिया घडतात.

१.३ संशोधनाचे महत्वः-

प्रस्तुत संशोधनामुळे वर्गाध्यापनामध्ये शिक्षक, शै.साहित्य, अध्यापनाची पद्धती, अध्ययन अनुभव या सर्व बाबी विद्यार्थी अध्ययनावर परिणाम करणाऱ्या असतात हे लक्षात येईल. वर्गाध्यापनातून सक्रिय अनुभव घेण्यावर भर देण्यास विद्यार्थ्यांना शिक्षकांनी मदत करणे आवश्यक आहे हे कळेल. तसेच यातूनच स्वत:चे असे ज्ञान निर्माण करत असतात. हे स्पष्ट होईल.

ज्ञानरचनावादी पध्दतीने अध्ययन केल्यास प्रस्तुत संशोधनाचे महत्व खालीलप्रकारे विशद करता येईल

१. विद्यार्थी सक्रिय व कृतीप्रिय अध्ययन कर्ते होतात.

२. स्मरणशक्तीपेक्षा उपयोजनाला महत्व दिले जाते.

३. घोकंपट्टीला सुट्टी आणि समजणे व विचार करण्यास प्राधान्य.

४. प्राप्तज्ञानाचे व्यवहारात उपयोजन करण्याची क्षमता निर्माण होते.

५. संक्रमनशील व गतीने ज्ञानप्राप्ती होते.

६. स्वतःच ज्ञानाची निर्मिती करण्यास प्रारंभ करतात व ज्ञानाचे मालक होतात.

७. कार्यकारण भाव शोधण्याची सवय लागते.

८. ज्ञानाची परीक्षा घेऊन ज्ञानाचा स्विकार करतात.

९. सृजनशील ज्ञानाची परिपूर्ण अभिव्यक्ती होते.

१०. नविन कल्पना ,नवविचार, स्वमत यांची देवाण घेवाण करतात.

११. सामाजिक व संप्रेरण कौशल्याचा विकास होतो.

१२. इतरांचे मत, विचार व कल्पना स्विकार करण्याची सवय लागते.

ज्ञानरचनावादामुळे काही महिन्यात परिणाम दिसुन येतात.विद्यार्थ्यांच्या मनातील भिती नाहिसी होते.सहभागी आकलन वाढते.मुलं प्रगत होतात.

१.४ संशोधनाचे समस्याविधानः-

इयत्ता १ ते ५वर्गशिक्षणात ज्ञानरचनावाद अध्ययन पद्धतीच्या उपयुक्ततेचा अभ्यास.

१.५ कार्यात्मक व्याख्याः-

१.५.१ इयत्ता १ ते ५ चे वर्गशिक्षण :

RTE ॲक्टनुसार ६ ते १४ वयोगटातील बालकांना दिले जाणारे प्रारंभिक शिक्षण

१.५.२ ज्ञानरचनावाद अध्ययन पद्धतीः

पूर्व ज्ञानाच्या आधारे नविन संकल्पनाची रचना व त्यातून अध्ययन घडणे यास ज्ञानरचनावाद अध्ययन पद्धती म्हणतात.

१.५.३ उपयुक्तेचा अभ्यासः-

ज्ञानरचनावादी पद्धतीची फलश्रुती तपासणे म्हणजे उपयुक्ततेचा अभ्यास होय.

१.६ उद्दिष्टे:-

१. ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धतीचा अभ्यास करणे.

२. ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धतीमध्ये विद्यार्थी कृतीशिलतेचा अभ्यास करणे.

३. ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धती उपयोजनाला महत्व देते याचा अभ्यास करणे.

४. ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनशिलता निर्माण होते याचा अभ्यास करणे.

५. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीमुळे विद्यार्थ्यांमधील संप्रेषण कौशल्याचा विकासाचा अभ्यास करणे.

१.७ गृहितके:-

१ ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धतीने विद्यार्थी अध्ययन करतात.

२ ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये कृतीशिलता निर्माण होते.

३ ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धती विद्यार्थ्यांच्या उपयोजनाला महत्व देते.

४ ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सृजनशिलता निर्माण होते.

५ ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धतीमुळे संप्रेषण कौशल्याचा विकास होतो.

१.८ परिकल्पना :

अ. संशोधन परिकल्पना

१. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीने अध्ययन करण्यामध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनीमध्ये फरक आहे.

२. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीमध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्यामध्ये कृतीशिल अध्ययनकर्ते बनण्यामध्ये फरक आहे.

३. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीमध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्यामध्ये उपयोजनाबाबत दृष्टिकोनात फरक आहे.

४. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीने विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्यामध्ये सृजनशिलता निर्माण होण्यामध्ये फरक आहे.

५. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीमध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनीमध्ये संप्रेषण कौशल्याच्या विकासामध्ये फरक आहे

ब. शून्य परिकल्पना :

१. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीने अध्ययन करण्यामध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनी मध्ये कोणताही सार्थकतापूर्ण फरक नाही.

२. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीमध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्यामध्ये कृतीशिल अध्ययनकर्ते बनण्यामध्ये कोणताही सार्थकतापूर्ण फरक नाही.

३. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीमध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्यामध्ये उपयोजनाबाबत दृष्टिकोनात कोणताही सार्थकतापूर्ण फरक नाही.

४. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीने विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्यामध्ये सृजनशिलता निर्माण होण्यामध्ये कोणताही सार्थकतापूर्ण फरक नाही.

५. ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीमध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनीमध्ये संप्रेषण कौशल्याच्या विकासामध्ये कोणताही सार्थकतापूर्ण फरक नाही.

१.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादाः-

१.९.१ संशोधनाची व्याप्तीः-

अ) क्षेत्रव्याप्तीः-

प्रस्तूत संशोधन हे बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेशी संबंधित आहे.

ब) आशय व्याप्तीः-

प्रस्तूत संशोधन हे ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धती ही प्राथमिक शिक्षणासाठी उपयूक्त पद्धती आहे या आशयाशी संबंधित आहे.

क) घटक व्याप्तीः-

प्रस्तूत संशोधन हे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील १ ली ते ५वी च्या विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.

ड) काल व्याप्ती :-

प्रस्तूत संशोधन हे २०१७ ते २०२० या कालावधीत होणार आहे.

१.९.२ संशोधनाची मर्यादा :-

१.९.२.१ क्षेत्र मर्यादाः-

प्रस्तूत संशोधन हे बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १ ते ५ वर्ग असणाऱ्या प्राथमिक शाळेशी संबंधित आहे.

१.९.२.२ आशय मर्यादा :-

प्रस्तूत संशोधन ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धतीची उपयुक्तता आशयपूरतेच मर्यादित आहे.

१.९.२.३ घटक मर्यादाः-

प्रस्तूत संशोधन हे बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १ ते ५ वर्ग असणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.

१.९.२.४ कालमर्यादाः-

प्रस्तूत संशोधनाचे निष्कर्ष हे डिसेंबर २०१७ ते डिसेंबर२०२० या कालावधीपुरतेच मर्यादित आहेत.

१.१० संबंधित साहित्य व गत संशोधनाचा आढावा

गतसंशोधनाचा आढावा खालील मुद्याच्या आधारे स्पष्ट होतो.

- पूर्वीच्या संशोधनातून संबंधित घटनेची माहिती प्राप्त होऊन त्याला अनुसरून वर्तमान संशोधनास योग्य दिशा मिळते.
- संबंधित संशोधनातून व साहित्यातून अवलोकनाद्वारे प्रत्येक टप्याचे गुण व वैशिष्ट्ये समजण्यास मदत होते.
- संशोधन वस्तुनिष्ठ, फलदायी होण्यास संबंधित संशोधन पुरक ठरते.
- संशोधन विषयासंबंधीचे गृहितके, सिध्दांतमांडणी आणि संकल्पना स्पष्ट होतात.

- संदर्भ साहित्याचा अभ्यास करून संशोधकास संशोधनाची गुणवत्ता वाढवता येते.
- प्रस्तूत संशोधनातील निष्कर्ष व मागील संशोधनातील निष्कर्ष यांची तूलना करता येते.
- प्रस्तूत संशोधनाची मांडणी करण्यास मदत होते.
- संशोधकास आपल्या संशोधनाचे स्वरूप निश्चित करता येते.

१.११ गतसंशोधन व प्रस्तूत संशोधनातील फरक

ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धतीबद्दल यापुर्वी संशोधन झालेले आहे. पुर्वीपासून ज्ञानरचनावाद या पद्धतीच्या वापराने NCERT तसेच MSCERT या प्रशिक्षण संस्थेने आपल्या पाठयपुस्तकाची रचना बालभारतीला करायला लावलेली आहे.परंतु आता इयत्ता १ ते १० वी या वर्गांना आलेली पाठयपुस्तके ही संपूर्णपणे ज्ञानरचनावादी अध्ययनपद्धतीवर आधारलेली आहेत.म्हणून संशोधकाने ही समस्या घेऊन उपयुक्तता तपासण्यासाठी प्रस्तूत संशोधन हाती घेतले आहे.

१.१२. संशोधन पध्दती

प्रस्तूत संशोधनासाठी प्रायोगिक पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

१.१३. संशोधनाचा प्रकार

प्रस्तूत संशोधन हे उपयोजित संशोधन या प्रकाराशी निगडीत आहे.

१.१४. साधने

प्रस्तूत संशोधनासाठी खालील साधनाचा वापर करण्यात येणार आहे.

1. प्रश्नावली - पूर्वचाचणी व उत्तरचाचणी
2. मुलाखत
3. अनुसूची
4. निरिक्षण

१.१५. सांख्यिकीय परिमाण

प्रस्तूत संशोधनासाठी संशोधक सांखिकीय परिमाणामध्ये मध्यमान, प्रमाणविचलन, टि मूल्य या सांख्यिकीय तंत्रांचा वापर करणार आहेत.

१.१६. संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श

अ) जनसंख्या

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या केंद्रीय प्राथमिक शाळा बनसारोळा या शाळेतील इयत्ता १ ते ५ वर्गातील ३२३ विद्यार्थी ही जनसंख्या असेल.

ब) न्यादर्श

प्रस्तूत संशोधनासाठी बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ५ वी वर्गातील प्रत्येकी १० विद्यार्थी व १० विद्यार्थीनी असे एकुण ५० विद्यार्थी व ५० विद्यार्थीनी हा प्रस्तूत संशोधनाचा न्यादर्श असेल.

१.१७. न्यादर्श निवड पध्दत

प्रस्तूत संशोधनासाठी प्रमाणबध्द स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने इयत्ता १ ते ५वी तील विद्यार्थी व विद्यार्थीनींची निवड करण्यात येईल.

१.१८. कार्यवाहीचे टप्पे

१. प्रस्तूत शाळेतील विद्यार्थ्यांची प्रमाणबद्ध स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने इयत्ता १ ते ५ वी वर्गातील प्रत्येकी १० विद्यार्थी व १० विद्यार्थीनींची निवड केली जाईल.

२. प्रत्येक गटात १ ते ५ वी वर्गातील २५ विद्यार्थी व २५ विद्यार्थीनी असे एकुण ५० विद्यार्थी असतील.

३. या दोन गटापैकी एक गट प्रायोगिक असेल व दुसरा गट नियंत्रित असेल.दोन्ही गटाची पुर्वचाचणी घेतली जाईल.इयत्ता १ ली २री साठी मुलाखत, निरिक्षण, अनुसूची या तंत्राचा वापर करून प्रश्नावली भरून घेतली जाईल. तर इयत्ता ३ते ५ वी साठी प्रश्नावली भरून घेतली जाईल.

४. नियंत्रित गटाला पारंपारिक पद्धतीने व प्रायोगिक गटाला प्रायोगिक पद्धतीने अध्यापन केले जाईल.नंतर दोन्ही गटाची उत्तर चाचणी घेतली जाईल.

५. पुर्वचाचणी व उत्तर चाचणीतील गुण यांची तूलना करून मध्यमान,प्रमाण विचलन व टी टेस्टद्वारे परिणामकारकता तपासली जाईल.यावरून ज्ञानरचनावादी अध्ययन पद्धती उपयुक्त आहे की नाही हे निश्‍चित करता येईल.

१.१९. प्रकरणे योजना

संशोधन विषयाचे प्रबंध लेखन करण्याची प्रकरण योजना पुढील प्रमाणे असेल.

अ.क्र.	प्रकरण	विषय
१	प्रकरण पहिले	प्रस्तावना
२	प्रकरण दुसरे	संबंधित साहित्य व गतसंशोधनाचा आढावा
३	प्रकरण तिसरे	संशोधनाची कार्यपध्दती
४	प्रकरण चौथे	माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
५	प्रकरण पाचवे	संशोधनाचे निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय

१.२०. वेळापत्रक

अ.क्र.	संशोधन कार्य	कालावधी	महिने
१	संशोधन समस्येची निवड व आराखडा सादरीकरण	डिसेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८	३
२	संबंधीत साहित्याचा आढावा	मार्च २०१८ ते जुलै २०१८	५
३	प्रत्यक्ष प्रयोग, मुलाखत सूची तयार करणे	ऑगस्ट २०१८ ते डिसेंबर २०१८	५
४	माहिती संकलन	जानेवारी २०१९ ते एप्रिल २०१९	४
५	संकलीत माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन	मे २०१९ ते ऑगस्ट २०१९	४
६	अहवाल लेखन	सप्टेंबर २०१९ ते जानेवारी २०२०	५
७	संशोधन अहवाल सादरीकरण	फेब्रुवारी २०२० ते जून २०२०	५

१.२१. अंदाज पत्रक

अ.क्र.	विवरण	रक्कम
१	पिएच.डी.प्रवेश शुल्क	२००००/-
२	संदर्भ ग्रंथ खरेदी	१००००/-
३	फोन सुविधा	५०००/-
४	संगणक खरेदी	५००००/-
५	झेरॉक्स	१००००/-
६	माहिती संकलन	१५०००/-
७	प्रवास खर्च	४००००/-
८	टंकलेखन	१५०००/-
९	प्रबंध प्रती	२००००/-
१०	कार्यशाळा चर्चा सत्र	२००००/-
११	एकूण	२,०५,०००/-

१.२२. संदर्भ ग्रंथ सूची

१. माने सुरेश. (२०१६), ज्ञानरचनावाद. सांगली: अक्षरगंगा प्रकाशन

२. नामदेव माळी. प्रतिभा भराडे, ज्ञानरचनावाद. सांगली: अक्षरगंगा प्रकाशन

३. पानसे रमेश. रचनावादी शिक्षण, सांगली : अक्षरगंगा प्रकाशन

४. दांडेकर रेणू, शिकुयाआनंदे. ज्ञानरचनावाद, पुण

५. घोरमोडे के.यु.घोरमोडे कलाकृष्ण. २००७ शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. नागपुर : विद्याप्रकाशन.

६. देशपांडे लिना. १९९९. सर्वेक्षण संशोधन पध्दती. पुष्पचौथे. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. दोडेकर वा.ना. (१९९४). शैक्षणिक मुल्यमापण व संख्याशास्त्र. प्रथम आवृत्ती पुणे : विद्या प्रकाशन.

८. पंडित बन्सी बिहारी आणि इ. (२०१०) शिक्षणातील संशोधन. पुणे : नित्यनुतन प्रकाशन.

९. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय दि. २२ जुन २०१५

१०. Videos, Blogs, youtube links

संशोधक

मुळे आर.जी.

एम.ए.(इंग्रजी), एम.फिल, एम.एड्.

मार्गदर्शक

डॉ.मोरे व्हि.पी.

एम.कॉम.,एम.ए. (अर्थशास्त्र),

एम.ए.(इतिहास), सेट, पिएच.डी.

प्राचार्य

शिक्षणशास्त्र महाविद्याल,कळमनुरी जि.हिंगोली.